# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990



Bharat Chandak

SATYA ELECTRICALS

POLYCAB | Racold | legrand | HAVELLS | L&T SWITCHGEAR | INDOASIAN | Finolex | KOLORS | USHA | PHILIPS | GreatWhite | SIEMENS

Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512

Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018

Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर वर्ष ३ रे अंक २०१ वा रविवार दि.७ जानेवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# ‘रायगडाला जेव्हा जाग येते’ नाटकावर टीकास्त्र

पुणे : नाट्यसंमेलन साजरे होण्यास उशीर झाला. परंतु हे संमेलन निर्विघ्न होत आहे त्याचा आनंद आहे. काळानुरूप नाटक बदलत गेली कौटूंबिक नाटकासह आता ऐतिहासिक नाटके ही होत आहेत. नवनवीन विषय नाटकात येत आहेत. असे शतकमहोत्सवी नाट्यसंमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार उद्घाटन सोहळ्यादरम्यान म्हणाले. तसेच यावेळी त्यांनी ‘रायगडाला जेव्हा जाग येते’ या नाटकावर अप्रत्यक्ष टीका केली.वृद्ध कलाकारांच्या मानधनात वाढ करावी, घरकुल योजना करावी, नाट्यगृहाच्या भाड्याच्या बाबतीत विचार करावा, यासाठी विशेष अनुदान देण्यात यावे, असे शरद पवार म्हणाले.रायगडाला



जेव्हा जाग येते शरद पवार ‘रायगडाला जेव्हा जाग येते’ या नाटकावर अप्रत्यक्ष टीका करत म्हणाले, वसंत कानेटकर यांचे ‘रायगडाला जेव्हा जाग येते तेव्हा’ हे नाटक महाराजांच्या कौटुंबिक बाबींवर अधिक भाष्य करते, परंतु आज महाराज अधिक हतबल झालेले दाखवले असे भासते, ‘रायगडाला जेंव्हा जाग येते’ या नाटकात जाग म्हणजे ‘उभारी’ असा अर्थ अभिप्रेत आहे मात्र त्यामध्ये महाराजांचे शल्य अधिक दाखवले आहे, मी हे नाटक दिल्लीत पाहिले, सध्याचे प्रेक्षक महाराजांना कुटुंब कलहातील का दाखवले असा प्रश्न विचारतील, आणि पुरावे ही मागतील.शरद पवार पुढे म्हणाले, ऐतिहासिक नाटकाची प्रेक्षक वाट पाहतो. पण इतिहासाचा विपर्यास करणे, इतिहास सोयीने दाखवणे आणि काही खल प्रवृत्तीचे उदात्तीकरण करणे थांबवणे गरजेचे आहे.मागेल त्याला ‘खुर्ची’ : उदय सामंत नाट्यसंमेलनाच्या उद्घाटनादरम्यान उदय सामंत म्हणाले, मागेल त्याला खुर्ची ही आपल्याकडे योजना आहे

# सत्यशोधक सिनेमा सर्वांनी आवर्जुन पहावा..! साविञीच्या लेकीने केले सर्वांना आव्हान

नवी मुंबई / के. एच. हनवते:- अध्यसमाज सुधारक, स्ञी शिक्षणाचे जनक, क्रांतीवीर महात्मा ज्योतिबा फुले यांचा सत्यशोधक फर्स्ट मूवी फिल्म चा फर्स्ट शो ५ जानेवारी रोजी संपुर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित झाला. आनेक ठिकाणी प्रेक्षकांनी पहीला शो पाहण्यासाठी मोठी गर्दी केल्याचे निदर्शनास आले. ग्रॅन्ड सेंटर मॉल नेरूळ नवी मुंबईतील सिनेमागृहात सत्यशोधक हा शो पहाण्यासाठी नेरूळ समता संघ महीला मंडळ, वंचित बहुजन महिला आघाडी व भारतीय बौध्द महासभा अशा सर्व महिलांनी हजेरी लावली. सत्यशोधक हा सिनेमा पाहून आनंद






व्यक्त केला. आपल्या समाजात प्रबोधन करण्यासाठी महिला सर्वञ कायम पुढे असतात, पुरूषांपेक्षा महीला हे एक पाऊल पुढेच आसतात हे महीलांनी दाखवून दिले आहे. या सर्व महीलांनी शो पाहील्या नंतर सर्व वंचित बहुजन समाजाला त्यांनी अव्हाण केले आहे की, हा सत्यशोधक सिनेमा आपल्या कुटुंबासह आवर्जून पहावा आणि आपल्या मुलांना तो जरूर दाखवावा. ज्यांने करून उद्याची उज्वल पिढी निर्माण होईल..! आपल्या युगपुरुषांनी आपल्या समाजासाठी, आपल्या देशासाठी त्यांचे किती ? फार मोठे योगदान आहे याची महती कळेल.

# निराधारांना आधार देण्याचे भाग्यच लागते ; गरजू पात्र लाभार्थी वंचित राहता कामा नये सांगायो लाभार्थ्यांना आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते मंजुरी पत्राचे वाटप

लातूर दि.०६ :- वडीलधाऱ्या माणसाचे, थोरामोठ्यांचे आशीर्वाद मिळाल्याशिवाय कोणीही प्रगती करू शकत नाही निराधारांना आधार देण्याचे भाग्य लागते. लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात सांगायो समितीच्या माध्यमातून निराधारांना आधार देण्याचे काम मोठ्या प्रमाणात केले जात आहे. ज्यांना खरा लाभ देणे गरजेचे आहे असे गरजू लाभार्थी वंचित राहणार नाहीत याची काळजी घेऊन सदस्यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न करावेत असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील रेणापूर आणि लातूर तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत गरजू पात्र लाभार्थ्यांना अनुदान मंजूरी पत्राचे भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते शुक्रवारी दुपारी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात वाटप करण्यात आले. यावेळी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस विक्रम काका शिंदे, महेंद्र गोडभरले, भाजपा पंचायत राज व ग्रामीण विकास सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, संगायो समितीचे लातूर तालुका अध्यक्ष वैभव सापसोड, रेणापूर तालुकाध्यक्ष वसंत करमुडे, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष अनिल भिसे, सतीश आंबेकर, भागवत सोट, भाजपाचे रेणापूर तालुकाध्यक्ष अँड. दशरथ सरवदे, लातूर तालुकाध्यक्ष बन्सी भिसे यांच्यासह दोन्ही तालुक्यातील संगायो समितीचे सदस्य भाजपाचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले






की, काँग्रेसच्या काळात संगायो लाभार्थ्यांना ६०० रुपये दरमहा मिळत होते तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी एक हजार रुपये केले आणि आता राज्यातील महायुती शासनाने पाचशे रुपयाची वाढ करून दरमहा दीड हजार रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. शंभर टक्के गरजू लाभार्थ्यांना लाभ मिळाला पाहिजे असे सांगून सांगायो लाभार्थ्यांनी प्रस्ताव दाखल करताना दलालापासून आपली लुबाडणूक आणि पिळवणूक होणार नाही यासाठी दक्ष रहावे असे आव्हान केले.

निराधारांना पगार देण्यासाठी मागील काळात अनेकांना अनेक अडचणी आल्या मानसिक त्रास झाला अपमानास्पद वागणूक मिळाली एवढेच नव्हे तर पंधरा-वीस वर्षांपूर्वी मंजूर केलेल्या पगारीच्या आधारावर आताही प्रत्येक निवडणुकीत काँग्रेसवाले गोरगरिबांना दबावाचे तंत्राचा वापर करत आहेत. पगार बंद करण्याची भाषा केली जाते असे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, गोरगरिबांना निराधारांना मिळणारी पगार कोणी करून देत नाही शासनामार्फत दिली जाते. त्यामुळे कोणाच्याही दडपणाला बळी पडू नका मंजूर झालेली पगार बंद होणार नाही असा आधार त्यांनी यावेळी बोलताना दिला.

प्रारंभी वैभव सापसोड आणि वसंत करमुडे यांनी आपले मनोगत व्यक्त करून या समितीवर काम करण्याची संधी दिल्याबद्दल समितीच्या वतीने आ. रमेशआप्पा कराड यांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन अँड. दशरथ सरवदे यांनी केले या कार्यक्रमास रेणापूर तालुक्यातील घनसरगाव, दर्जी बोरगाव, रेणापूर, पानगाव, हारवाडी, खरोळा, कुंभारवाडी, रामवाडी (ख), नरवटवाडी, पोहरेगाव, आदंलगाव, गव्हाण, दवणगाव लातूर तालुक्यातील मुरुड, सलगरा (बू), बामणी, भातांगळी, सावरगाव, मसला, अंकोली, बोरी, बोकनगाव, चिंचोली (ब) यासह इतर अनेक गावातील संगायो योजनेतील पात्र महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक, लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# निलंग्यात चार ठिकाणी जुगारावर छापेमारी

लातूर : प्रतिनिधी उपविभागीय पोलीस अधिकारी चाकूर तथा सहाय्यक पोलीस अधीक्षक बी.चंद्रकांत रेड्डी यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारावर निलंगा शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी चालणा-या मटका जूगारावर एकाच वेळी विविध पथके तयार करून कारवाई करण्यात आली असून या कारवाईत ३३ व्यक्ती विरोधात गुन्हे दाखल करण्यात आली आहेत तर २ लाख ९४ हजार रूपयांचा मुद्देमाल ही जप्त करण्यात आला आहे.दि. ४ जानेवारी रोजी निलंगा येथे वेगवेगळ्या ठिकाणी पत्र्याच्या शेडमध्ये, तसेच रूम मध्ये काही इसम मटका नावाचा जुगार खेळत आहेत. अशा मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारावर उपविभागीय पोलीस अधिकारी चाकूर यांनी निलंगा येथील शिवाजी चौक ते बँक कॉलनी जाणारे रोडवर, बँक कॉलनी परिसरात, औराद ते निलंगा जाणारे रोडवरील परिसरात, पिराजी नवनाथ कांबळे यांचे पत्र्याच्या घरामध्ये अशा चार ठिकाणी एकाच वेळी छापेमारी करून बेकायेशीररित्या मटका जुगार खेळत व खेळवीत असताना मिळून आल्याने एकूण ३३ इसमावर कार्यवाही करत त्यांच्याकडून रोख रक्कम व जुगाराचे साहित्य असा एकूण २ लाख ९४ हजार ५९० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.पोलीस ठाणे निलंगा मध्ये खालील नमूद इसमाविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम १८८७ चा कलम १२(अ) कायद्यान्वये प्रमाणे ४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# रेणा साखर कारखान्यास वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे या संस्थेचे २०२२-२३ या सालातील सर्वोत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमता व उत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापन प्रथम पुरस्कार जाहीर

दिलीपनगर, रेणापूर तालुक्यातील रेणा सहकारी साखर कारखाना हा राज्याचे माजी मंत्री तथा कारखान्याचे संस्थापक सहकारमहर्षी मा.श्री. दिलीपराव देशमुख साहेब, माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री मा. आ. अमित विलासराव देशमुख साहेब व लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष, लातूर ग्रामीण चे आमदार मा. आ.श्री. धिरज विलासराव देशमुख साहेब यांच्या कुशल मार्गदर्शन व नियोजनाने वाटचाल करत साखर कारखानदारीत विविध विक्रम करुन राज्यातील सर्व साखर कारखान्यापुढे रेणा कारखान्याने एक आदर्श निर्माण केला असुन कारखान्याने गळीत हंगाम २०२२-२३ मध्ये मिल मधील उसाचा तंतूमय निर्देशांक, रिडयुस्ट मिल एक्स्ट्रॅक्शन, साखर तयार करण्यासाठी लागणाऱ्या वाफेचा, विजेचा, बगॅस वापर गाळप क्षमतेमध्ये वाढ, गाळप क्षमतेचा वापर तसेच देखभाल दुरुस्तीसाठीचा खर्च इत्यादिचा तसेच साखरेचा प्रति क्विंटल रोखीचा उत्पादन प्रक्रीया खर्च व एकुण उत्पादन प्रक्रीया खर्च हा राज्याच्या सरासरी साखरेच्या उत्पादन प्रक्रीयापेक्षा कमी असल्याने, खेळत्या भाडवंलावरील व्याजाचा खर्च राज्याच्या सरासरी खेळत्या भाडवंलावरील व्याजाच्या खर्चापेक्षा कमी व इतर कारखान्याच्या तुलनेत इन्व्हेंटरी व्यवस्थापन सर्वोत्कृष्ठ आहे यासह इतर निकष पाहता वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे संस्थेच्या वतीने दिले जाणारे गळीत हंगाम २०२२-२३ या सालातील सर्वोत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमता व उत्कृष्ठ आर्थिक व्यवस्थापन प्रथम पुरस्कार जाहीर झाले असून सदरील पुरस्कार हा वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट पुणे संस्थेच्या दिनांक ११ जानेवारी २०२४ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये माजी केंद्रीय कृषी मंत्री मा. श्री. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या व इतर मान्यवरांच्या हस्ते मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.तसेच रेणा सहकारी साखर कारखाना पुरस्कृत केलेला कै. विलासराव देशमुख सर्वोत्कष्ट उद्योजकता पुरस्कार सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना लिमिटेड यांना जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्काराचे स्वरूप हे मानचिन्ह प्रशस्तीपत्र व रक्कम रुपये एक लाख रुपये देऊन गौरविण्यात येणार आहे.कारखान्याने यापुर्वी राष्ट्रीय साखर महासंघ दिल्ली यांचेमार्फत देण्यात येणारे देश पातळीवर व वसंतदादा शुगर इन्स्टीटयुट, पुणे यांचे मार्फत देण्यात येणारे तसेच राज्यस्तरीय महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ठ साखर कारखाना पुरस्कार व राज्यशासनाचा सहकारनिष्ठ पुरस्कारसह विविध १४ पुरस्कार कारखान्याने मिळवलेले आहेत. रेणा साखर कारखान्यास वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे यासंस्थेच्या वतीने गळीत हंगाम २०२२-२३ या सालातील सर्वोत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमता व उत्कृष्ठ आर्थिक व्यवस्थापन प्रथम पुरस्कार मिळाल्याबददल कारखान्याचे संस्थापक मा.श्री. दिलीपरावजी देशमुख साहेब, मा.आ.श्री. धिरज विलासरावजी देशमुख साहेब, चेअरमन मा.श्री.सर्जेराव मोरे व्हा. चेअरमन, मा.श्री. अनंतराव देशमुख्, कार्यकारी संचालक श्री. बी.व्ही.मोरे तसेच संचालक मंडळ अधिकारी व कर्मचारी यांचे कार्यक्षेत्रातील सर्व सभासदांकडुन अभिनंदन होत आहे.









## संपादकीय....

# नसे राम ते धाम सोडोनि द्यावे

सरकारमुळे या वर्षीचे विज्ञान अधिवेशन पुढे ढकलले गेले असेल, पण या सरकारचे विज्ञानाशी किती जवळचे नाते आहे ते कधी नीट बघितले आहे का?हवे की कशाला हवी ती दरवर्षी होणारी भारतीय विज्ञान परिषद? दरवर्षी जानेवारीत होणारी भारतीय विज्ञान परिषद म्हणजेच इंडियन सायन्स काँग्रेसचे यंदाचे १०९ वे अधिवेशन पुढे ढकलले गेले म्हणून काही नतद्रष्ट मंडळी टीका करत आहेत. करोत बापडी, आपण त्यांच्याकडे कशाला लक्ष द्यायचे? कारण २०२१, २०२२ ही कोविडची दोन वर्षे वगळता १९१४ पासून अखंडपणे ही अधिवेशने सुरू आहेत, त्याचे त्यांनी कधी कौतुक केले आहे का? निधीच्या कमतरतेमुळे २०२४ चे विज्ञान अधिवेशन पुढे ढकलले गेल्याची माहिती माध्यमांनी दिली आहे. आता पैशांअभावी सरकारने असा निर्णय घेतला असेल तर त्यात काय चुकीचे आहे? महागाई सतत वाढते आहे. सगळ्याच गोष्टींचे दर आकाशाला भिडताना दिसत आहेत. अशा परिस्थितीत आपण सर्वसामान्य माणसे नाही का एखादा खर्च पुढे ढकलत? कुणी घरखरेदी पुढे ढकलते, कुणी घरासाठीची एखादी मोठी खरेदी नंतर करू म्हणत मन मारते, कुणी एखादी सहल नंतर कधी तरी करू असे म्हणून घरीच बसते, तर कुणी अगदी लग्न वगैरेही पुढे ढकलून मोकळे होतात. आपल्याला महागाई आहे तर तशी ती सरकारलाही असणारच ना? नाही झाली पैशांची तजवीज म्हणून सरकारने एखादा कार्यक्रम ढकलला पुढे तर आपण नाही समजून घ्यायचे तर दुसरे कोण समजून घेणार? पण नाही, सरकारविरोधकांना दुसरा काही उद्योगच नसावा बहुतेक. एखाद्या गोष्टीची कावीळ झाल्यासारखेच त्यांचे हे वागणे आहे. जे झाले नाही किंवा केले जात नाही त्याबद्दलच सतत बोलत राहणे याला छिद्रान्वेषीपणा म्हणतात. म्हणजे समोर आकाश असले तरी त्यात काही छिद्र दिसते का ते पाहत बसणे. असेच करतात ही मंडळी. १०७ वर्षे नेमाने होत असलेले अधिवेशन यांना दिसते, पण गेल्या ७० वर्षांत कधीही उभे न राहिलेले अयोध्येतले मंदिर आता आकाराला आले आहे हे त्यांना दिसत नाही. येत्या २२ जानेवारीला होऊ घातलेली त्याची प्राणप्रतिष्ठा त्यांना दिसत नाही. खरे तर त्यांना काहीच दिसत नाही. सरकारने दाद न दिल्यामुळे भले विज्ञान अधिवेशन पुढे ढकलले असेल, पण या सरकारचे विज्ञानाशी किती जवळचे नाते आहे ते कधी नीट डोळे उघडे ठेवून बघितले आहे का? ते न बघताच या सरकारचे धार्मिक गोष्टींशी नाते जोडून मोकळी होतात ही मंडळी. पण हे सरकार आहे भाजपचे. या पक्षाचे नाते आहे हिंदू धर्माशी आणि हिंदू धर्मात तर विज्ञान अगदी ओतप्रोत भरले आहे. जगण्यामधल्या प्रत्येक गोष्टीचा हिंदू धर्माने विज्ञानवादी विचार केला आहे आणि तोही आज किंवा काल नाही तर गेल्या हजारो वर्षांपासून. मग हिंदू धर्माशी नाते सांगणाऱ्या पक्षाच्या सरकारने एखादे विज्ञान अधिवेशन पुढे ढकलले तर असेल तेवढेच सबळ कारण असा विचार करायचा की सुरू व्हायचे? इस्लामी देशांमध्ये अशी अधिवेशने होतच नाहीत, हे दडवून का म्हणून ठेवतात ही प्रसारमाध्यमे?किती विज्ञानवादी गोष्टी अगदी प्राचीन काळापासून आपण जगाला दिल्या आहेत गणितातील शून्याचा शोध ही आपली जगाला देणगी नव्हे काय? ती विज्ञानवादी नाही असे कोणत्या तोंडाने म्हणता येईल? प्राचीन काळात सुश्रुत मुनींनी शंभराहून जास्त प्रकारची उपकरणे वापरून वेगवेगळ्या प्रकारच्या शस्त्रक्रिया केल्याची उदाहरणे आपल्याकडे आहेत. पण रामायणातील पुष्पक विमान कसे विसरता येईल? बाकीचे जग खातेऱ्यात पडले होते, तेव्हा आपल्या देवदेवता विमानाने फिरत होत्या, तेव्हाच आपण विमानाचा शोध लावलेला होता ही मोठी गोष्ट नाही का? आपल्या आयुर्वेदाचे, योगाचे उपकार तर जग अजूनही विसरायला तयार नाही. ते विज्ञान नाही असे कसे म्हणता येईल? महाभारतातील कौरव हे तर टेस्ट ट्यूब बेबी नव्हते असे कुणीही म्हणावे. आपल्याकडे पुराणकाळात आकाशवाणी होत होती. एखादा देव किंवा देवी अचानक प्रकट होत असे. मोबाइल सुविधा आणि ओबी व्हॅनसारख्या यंत्रणांशिवाय हे सगळे कसे शक्य होते? नारद मुनी तर तिन्ही लोकी सहज संचार करत. दळणवळणाच्या अत्याधुनिक सुविधांशिवाय ते कसे शक्य होते? हनुमानाने उड्डाण करून लंका गाठली होती. नंतर पुन्हा लंकेहून उड्डाण करून हिमालयात जाऊन संजीवनी बुटी हवी म्हणून अख्खा द्रोणागिरी पर्वतच उचलून आणला होता. म्हणजे विमानाशिवायही एकेकट्याने उड्डाण करण्याचे कौशल्य आपल्याला अवगत होते. रामायण-महाभारतकालीन युद्धातील शस्त्रांची वर्णने वाचल्यावर शस्त्रास्त्रनिर्मितीत आपण किती पुढे होतो आणि आजच्या अण्वस्त्रांच्या तोडीस तोड शस्त्रे त्या काळात कशी निर्माण करत होतो, हे कसे विसरावे? नीट विचार करून पाहा बरे, आपले आहारशास्त्र किती विज्ञानवादी आहे ते. आजच्यासारखी कोणतीही साधने उपलब्ध नसताना आपण केलेल्या खगोलशास्त्राचा अभ्यास, त्यातून मांडलेले निष्कर्ष महत्त्वाचे नव्हते? आणि त्याबरोबरच विकसित झालेले ज्योतिषशास्त्र विज्ञान नाही असे कोण म्हणते? गोमूत्र, शेण, त्यातील औषधी गुणधर्म यांचा आजच्या काळातही नव्याने वैज्ञानिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे आवश्यक आहे, असे फक्त आपण भारतीयच म्हणू शकतो, यात चुकीचे ते काय आहे? कारण दारात तुळस असणे आणि तिच्यासमोर रोज दिवा लावणे यातदेखील विज्ञान शोधणारी माणसे होतो आपण एके काळी पण मधल्या ७० वर्षांत आपण आपला इतिहास विसरलो, आपल्या परंपरा विसरलो, आपले विज्ञान विसरलो आणि कुठल्या कुठे भरकटत गेलो. आपल्याला वाटत होते की आपण आधुनिकतेची वाट चालत आहोत. पण ते तसे नव्हतेच. आपण मुळात आधीपासूनच आधुनिक होतो. अगदी प्राचीन काळापासून आपण आधुनिक होतो. पण ते सगळे पूर्वसंचित विसरून पाश्चात्त्यांच्या नादाने भरकटलो होतो. जे आपले नव्हतेच, त्याला ओढूनताणून आपले म्हणत बसलो होतो. त्यातून निर्माण झालेला गोंधळ निस्तरून आता कुठे आपली गाडी रुळावर येते आहे. काही ठिकाणी ज्योतिषाचा शास्त्र म्हणून अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे. गोमूत्र कसे औषधी आहे यांवर संशोधन सुरू आहे. कुठल्या कुठल्या विद्यापीठांमध्ये आदर्श सून होण्यासाठी काय करायला हवे याचे अभ्यासक्रम आखले जात आहेत. याशिवायही आपल्या प्राचीन काळातल्या आधुनिकपणाची, विज्ञानवादाची किती तरी उदाहरणे आहेत. आपण हे सगळे विसरू नये म्हणून आजकालची वेगवेगळ्या ठिकाणची राजकीय मंडळी आपल्याला त्यांची सातत्याने आठवण करून देत असतात.आपल्या अवतीभवती असे सगळे विज्ञानमय वातावरण असताना खरे तर आपणच सरकारला सांगायला हवे की कशाला हवी ती दरवर्षी होणारी भारतीय विज्ञान परिषद? गेल्या वर्षीच्या परिषदेवर म्हणे पाच कोटी रुपये खर्च झाले. आपल्याकडे विज्ञानाची इतकी प्राचीन परंपरा असताना आपल्याला असा वायफळ खर्च करण्याची गरजच काय आहे? काही संशोधकांनी कुठे तरी जमून कसल्या तरी संशोधनांचे पेपर वाचत बसणे आता फक्त पुढे ढकलू नका, ते बंदच करून टाका कायमचे त्यात काहीही राम राहिलेला नाही. स्वत:ला रामाचा दास म्हणवणाऱ्या रामदासांनीही सांगितलेच आहे

# देशभक्ता विरोधात देशद्रोही अंधभक्त.

भारत हा कृषिप्रधान देश होता.त्यामुळेच एक घोषणा केली जात होती जय जवान जय किसान पूर्वी सरकार आणि समाज असा थेट सामना असे.शेपन्न इंच छाती असणारे आदरणीय नरेंद्र मोदी सत्तेवर आल्यानंतर सरकार आणि समाज यांच्यामध्ये देशभक्त व अंधभक्त नावाची एक विचित्र अशी स्वयंघोषित फौज उभी झाली आणि ती सरकारची बाजू घेऊन आंदोलनजीवी विरोधात पोलिसा अगोदर लढण्यास सज्ज असते.भारत सरकार राहिले नाही. तर मोदी सरकार म्हणून सर्वच प्रशासकीय अधिकारी गुलामा सारखे वागतांना दिसतात. त्यांना जागरूक नागरिकानी विचारले की तुम्ही भारत सरकारची नोकरी करता की भाजपा खासदार नरेंद्र मोदी लोकप्रतिनिधी म्हणून देशाचे प्रधानमंत्री म्हणून पांच वर्षासाठी देशाची सेवा करणार आहेत.त्या मोदी सरकारचे तुम्ही नोकर आहात काय ?. गावागावात विकास रथ घेऊन फिरणाऱ्या अधिकारी वर्गाला असे प्रश्न विचारल्यावर अनेक ठिकाणी ही देशभक्त व अंधभक्त जणू सरकार ही या फौजेची खाजगी मालमत्ता आहे अशा पद्धतीने नागरिका सोबत लढाई करीत होती. या देशभक्त व अंधभक्तांचा समज असा आहे की आपल्या शिवाय इतर समाजाचा सरकारवर काही अधिकारच नाही किंवा सरकार म्हणजे काय ते फक्त आपल्यालाच कळतं,इतरांना नाही.यामुळेच देशात देशभक्ता विरोधात देशद्रोही अंधभक्त असा संघर्ष उभा राहील आहे.मणीपुर हिंसाचारात जळत असतांना,माता भगिनींनीची नग्न धिंड काढत असतांना मात्र देशभक्त देशद्रोही अंधभक्त कुठे ही पेटून उठतांना दिसले नाही.यांची मानसिकता गाय ला माता म्हणते,मातीला माता मानते.पण जिवंत महिलांना माता मानत नाही. भारत देशात अनेक सरकारे आली आणि गेली परंतु असे कधीचं झाले नव्हते.खरे तर सरकारकडून मिळणारे पेट्रोल,डिजेल,गॅस सिलिंडर शिक्षण,आरोग्य,रोजगार, महागाई, सांस्कृतिक,कला क्रीडा सर्व प्रकारच्या सुविधा सवलती,ही इतर समाजाला जशी अनुभवावी लागतात,तशीच या फौजेतील देशद्रोही अंधभक्तांना देखील अनुभवावी लागतात.ही फौज सर्वच समाजातील एक हिस्सा आहे, पण सरकारची बाजू मांडण्यासाठी हे अंधभक्त समाजापासून स्वताचे वेगळं अस्तित्व दाखवत असतात,आणि हिरिरीनं इतरांपेक्षा वेगळा विचार मांडणाऱ्या समाजातील प्रत्येक घटकाशी लोकलज्ञा सोडून दादागिरीने पंगा घेत असतात.कारण पोलिस व प्रशासन त्यांच्या बाजूने मजबूरीने उभे असते.तिथे त्यांना सिनेमातील बाजीराव सिंघम पोलीस अधिकारी भेटत नाही.त्यामुळेच या देशद्रोही अंधभक्त फौजेला माज आला आहे म्हणूनच ते सरकारवर टीका करणाऱ्यांच्या विरोधात उभे राहतात त्यांना विरोध केलेला खपत नाही. सरकारची अशी असरकारी फौज असणं हे मनुवादी मानसिकता असणारे नवे राजकारण आहे.हे किती चांगलं आणि किती वाईट हे येणारा काळ निश्चित ठरवणारा असेल. तेव्हा वेळ गेलेली असेल हे मात्र निश्चित.पण यामुळे सर्वच समाजात एक मोठी दरी निर्माण झाली असल्याचे सत्य चित्र समाजात स्पष्टपणे दिसत आहे.आणि लोकांमध्ये आपापसात एक विचित्र कटुता निर्माण झाली आहे.आता प्रश्न असा पडतो की ही कटुता देशाला पुढं नेमक कुठे घेऊन जाणार आहे?. भाजपाचे नरेंद्र मोदी सरकार हे काही अमरपट्टा घेऊन आलेलं नाही, ते सत्तेत नसेल तेव्हा आजच्या या देशद्रोही अंधभक्त फौजेचं काय होणार? मराठा ओबीसी बेबीच्या देठा पासुन बोबळत होता गर्वसे कहो हम हिंदू है आणि बच्चा बच्चा राम का मंदिर के काम का.आता श्रीराम मंदिर तयार झाले आहे. त्याच्या एकूण व्यवस्थापनात समितीत,कमिटीत कुठेच मराठा,ओबीसी औषधला सुद्धा नाही. त्यांचे दुःख आम्हाला होत आहे म्हणूनच आम्ही लिहत आहोत.कारण आमच्या धडावर आमचे डोके आहे त्यातील मेंदू आमच्या सद्विवेकबुद्धीला पटले तर स्वीकारतो आणि योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याची क्षमता त्यात आहे.मराठा ओबीसी नां वाटत होते की प्रभू श्रीराम यांचे मंदिर झाले की आमच्या शिक्षण आरोग्य,रोजगार,कला क्रीडा,सांस्कृतिक समस्या कायमस्वरूपी दूर होतील.येणाऱ्या काळात तुम्ही मराठा ओबीसी कुठे असणार याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे.

मराठा ओबीसीला यातला धोका दिसत नव्हता. 'आपलं सरकार' आले असे कुणा एका समाजाला त्यातील एका गटाला वाटणे आणि त्या गटाने इतर समाजाशी दुश्मनी स्वीकारणं आणि इतरांना सरकारबद्दल काही बोलण्याचा अधिकार नाकारणे.सतराशे साठ जाती आणि धर्म संविधानामुळे गुण्या गोविंदाणे आनंदाने नांदत असतांना त्यांना आम्हाला आवडेल असंच बोला असे आग्रही राहणे या विकृतीनं एकसंघ देश ही भावना बाजूला पडते आहे.राज्य व केंद्र सरकारच्या एकूण



कारभरा विरोधात व समाज व्यवस्थेबद्दल आता नगरिकानी समाजात सत्य परिस्थितीची अशी विश्लेषक चर्चा किंवा संवाद होतांना टीका बिलकुल झालीच नाही पाहिजे ही मानसिकता देशभक्ता विरोधात देशद्रोही अंधभक्तांची झाली आहे.त्याला चॅनल मीडिया प्रिंट मीडिया संपादक,पत्रकार घाबरत असतील तर कोणत्याही समस्याची चर्चाच होणार नाही.देशभक्ता विरोधात देशद्रोही अंधभक्तांनी चाळीस पैशांचे चियर लीडर सारखे पत्रकार,संपादक खरीदी करून ठेवले आहेत.भारतात १४ वर्षांपूर्वी आयपीएल क्रिकेट सामने सुरू झाले.त्यात एक मजेशीर प्रकार होता. खेळाडूने चौकार,षटकार मारला की मैदानाबाहेरील छोट्याश्या स्टेजवर तोकड्या कपड्यातील परदेशी मुली नाचू लागायच्या.त्यामुळे क्रिकेट शौकीन हवसे नवसे गवसे त्या मुलीकडे पाहून जोर जोरात शिटी वाजऊन जल्लोष करतात.त्या मुलीना क्रिकेटचे काही ज्ञान होते किंवा खेळाडूंची माहिती होती असे काहीही नसतांना त्या जीवतोडून पांच मिनिट संपूर्ण शरीर हलवित असतात.फक्त इशारा झाल्यावर नाचून लोकांचं लक्ष वेधून घेणे एवढंच त्यांचं काम आणि चियर लीडर हीचं त्या मुलींची ओळख असते.तशीच पत्रकार संपादक आणि अंकर यांची झाली आहे.देशभक्ता विरोधात देशद्रोही अंधभक्त काही करत असतांना ही पत्रकार संपादक काहीच बोलत नाही. नको त्या विषयावर मात्र खुपवेळ चर्चा घडवून आणतात. चोवीस तास तेच दाखवतात. असाच प्रकार २०१४ पासून भारतीय राजकारणात पण सुरू झाला.जशा मैदानातील चियर लीडर मुली तोकड्या कपड्यात नाचू लागतात तशी तोकड्या बुद्धीची काही देशद्रोही अंधभक्त मंडळी कोणत्याही सरकारी मूर्खपणावर नाचू लागतात.त्यांच्या दृष्टीने तो मास्टर स्ट्रोक असतो. देशात केंद्र सरकारने जे काही लक्षवेधी निर्णय घेतले. त्यातील उत्तम उदाहरण म्हणजे नोटबंदी, जी एस टी,लॉक डाऊन असो, की थाळ्या वाजवणे असो, देशभक्ता विरोधात देशद्रोही अंधभक्त रुपी चियर लीडर तोकड्या बुद्धीने नाचायला नेहमीच तयार असता.आणि वर गेल्या ७५ वर्षांत असा मास्टर स्ट्रोक कोणी मारलाच नव्हता असे बेबीच्या देठा पासून ओरडून ओरडून सांगतात.सत्तेत सरकार कोणतेही असो ते चुकले की जनतेला त्या सरकारला प्रश्न विचारायचा अधिकार असतो. त्या प्रश्नाची सरकारनेच उत्तरे दिली पाहिजे.मध्यस्ती व्यक्ती,किंवा संघटना यांनी लोकांना शिव्या देणे ट्रोल करणे याला काही अर्थ नाही. त्यामुळे काय योग्य व काय योग्य नाही याचा सदसदविवेक बुद्धीने विचार करून प्रत्येक नागरिकाने विचार करावा फक्त आपण त्या पक्षाचे कार्यकर्ता,पदाधिकारी आहोत म्हणून आपल्या पक्षाने जे धोरण आखले,निर्णय घेतले ते सर्वच योग्य आहेत व त्याला लोकांनी विरोध केला म्हणुन शिव्या देणे, देशद्रोही,धर्मद्रोही ठरवणे अशी मनुवादी मानसिकतावाली वृत्ती सोडून द्यायला पाहिजे.भारतीय संविधानाने सरकारला विरोध करण्याचा लोकांना अधिकार आहे हे मान्य करायला पाहिजे. आणि आपण मतदार म्हणून ज्यांना लोकप्रतिनिधी म्हणून निवडून दिले त्यांनी देखील निर्भीडपणे बिनधास्तपणे विचारले पाहिजे.या देशभक्ता विरोधात देशद्रोही अंधभक्त मंडळींना न घाबरता आपला सरकारवर टिका करण्याचा अधिकार टिकवून ठेवण्यासाठी सतत जागरूक राहिले पाहिजे.किंवा जे ही धाडस करतात त्यांना तन,मन,धनाने योग्य ते सहकार्य मदत केली पाहिजे. तेच होत नसल्यामुळे देशभक्ता विरोधात देशद्रोही अंधभक्त शिरजोर झाले आहेत. त्यामुळे कोण्या एका समाजाचे नुकसान होणार नाही तर संपूर्ण देशवाशी नागरिकांचे न भरून येणारे नुकसान होईल ही प्रत्येक नगरिकानी,मतदारांनी अंधभक्तांनी लक्षात घ्यावे.

*************

**सागर रामभाऊ तायडे**
**९९२०४०३८५९,**
**भांडुप,मुंबई.**

# युवाशक्तीचा आयपीएल

दीड दशकांपेक्षा अधिक काळापासून आयपीएलचा भारतात बोलबाला असून त्यामुळे भारतीय क्रिकेट मंडळाची आर्थिक स्थिती चांगलीच सुधारली आहे. याशिवाय देश विदेशातील अनेक तरुणांना भारीभक्कम पैसे देऊन त्यांना त्यांचे स्वप्न साकार करण्याची संधीही मिळत आहे. म्हणूनच आयपीएलला कोट्याधीश करणारी कंपनी असेही म्हटले जाते. यंदाचे वर्ष 'मिनी लिलावा'चे होते. परंतु यातही समीर रिझवी, शुभम दवे, कुमार कुशाग्र, रॉबिन मिंज आणि एम. सिद्धार्थसारख्या पहिल्या पायरीवर असलेले खेळाडू कोट्याधीश झाले. काहींना तर एवढे पैसे मिळाले की, तेवढे पैसे तीन दशकांपूर्वीच्या क्रिकेटपटूंना आपल्या संपूर्ण आयुष्यातही कमवता आले नाही.यंदा 'अनकॅप्ड' खेळाडूंत सर्वात मोठी लॉटरी लागली ती मेरठच्या समीर रिझवीची. अनकॅप्ड खेळाडू म्हणजे ज्यांना अद्याप आंतरराष्ट्रीय सामना खेळण्याची संधी मिळालेली नाही, असे खेळाडू. यावेळी असे काही ॲनकॅप्ड खेळाडू चर्चेत होते, ज्यांना आतापर्यंत आयपीएलमध्येही खेळण्याची संधी मिळाली नव्हती. समीरला चेन्नई सुपरकिंग्जने ८.४ कोटी रुपयांत खरेदी केले. विशेष म्हणजे या २० वर्षीय क्रिकेटपटूने अलिकडेच दहावीची परीक्षा उत्तीर्ण केली आहे आणि त्याने फारसे क्रिकेटही खेळलेले नाही. त्याने यावर्षी यूपी टी-२० लीगमध्ये धमाल उडवून दिली. त्यांमुळे त्याने अनेक आयपीएल फ्रंचाईजीचे लक्ष वेधून घेतले. या लीगमध्ये त्याने नऊ सामन्यांत दोन शतकांसह ४५५ धावा केल्या. याप्रमाणे नागपूरमध्ये पानटपरी चालविणारे बद्रीप्रसाद यांचा मुलगा शुभम शर्मा याला राजस्थान रॉयल्सने ५.६ कोटी रुपयांत खरेदी केले. एवढे पैसे मिळतील, अशी अपेक्षाही त्याने बाळगली नव्हती. कुमार कुशाग्रला दिल्ली कॅपिटल्सने ७.२ कोटी रुपयांत, रॉबिन मिंजला गुजरात टायटन्सने ३.६ कोटी रुपयांत आणि एम. सिद्धार्थला लखनौ सुपरजायंट्सने २.४ कोटी रुपयांत खरेदी केले होते. आयपीएलने त्यांच्या करियरच्या सुरुवातीलाच चार चांद लावले आहेत. या पंखाच्या आधारे आता किती झेप घ्यायची हे त्यांच्या हातात आहे. याप्रमाणे त्यांचा राष्ट्रीय संघात स्थान मिळवण्याचा मार्ग सुकर होणार आहे.मुळात आयपीएलचा फॉर्मेटच अनकॅप्ड खेळाडूंची मागणी



नोंदविणारा आहे. प्रत्येक संघाला निश्चित संख्येत अनकॅप्ड खेळाडूंना घ्यावे लागते आणि यासाठी ते वर्षभर तरुणांच्या शोधात असतात आणि त्यांना घेण्यासाठी ते सर्वशक्तनिशी प्रयत्न करतात. सर्व फ्रंचाईजीना एक गोष्ट ठाऊक असते आणि ती म्हणजे अनकॅप्ड खेळाडू कितीही सक्षम असला तरी त्याचा संघ हा बळकट होऊ शकत नाही. कारण अनकेदा तरुण ऐनवेळी अपयशी ठरताना दिसतात, परंतु जे यशस्वी होतात, त्यांना भविष्यात चांगली रक्कम मिळू लागते. फ्लॉप खेळाडूंना तात्काळ संघाबाहेरचा रस्ता दाखविला जातो. आयपीएल लिलाव म्हणजे चमत्काराला नमस्कार असे म्हणता येईल. यासंदर्भात आपण जयदेव उनाडकटचे उदाहरण घेऊ. त्याला २०१८ मध्ये ११.५ कोटी रुपयांत खरेदी केले. मात्र तो आगामी वर्षात छाप पाडू शकला नाही. परिणामी आता त्याची किंमत १.६ कोटींवर आली. उमेश यादवचे मूल्य देखील दोन कोटींपर्यंत घसरले आहे. गेल्यावर्षी चांगली कामगिरी करत त्याला ५.८ कोटी रुपये मिळाले होते. बहुसंख्य तरुण खेळाडू स्टार होतात आणि दुसऱ्याच वर्षी ते लुप्त होतात.वेगवान गोलंदाज कामरान खानला तर दिवंगत गोलंदाज शेन वॉर्न हा 'टॉरनॅडो' म्हणायचा. पण पहिल्याच हंगामात हा हीरो शैलीवरून वादात अडकला आणि तेथेच ढेपाळला. अशा खेळाडूंत नाथू सिंह आणि पवन नेगीसह अनेक खेळाडूंचा समावेश करता येईल. आयपीएलने क्रिकेटचा स्तर उंचावला की नाही हा चर्चेचा मुद्दा राहू शकतो. परंतु आयपीएलने क्रिकेटपटूंना मालामाल केले, हे मात्र खरे. यावरून कोणाचाही आक्षेप नसेल. फ्रंचाईजी हे आपल्या गरजेनुसार खेळाडूंवर पैसा ओततात. या कारणांमुळे क्रिकेटप्रेमींना ज्या खेळाडूला अधिक पैसा मिळेल, असे वाटत असते, तसा विचार संघ देखील करत नाही. यासाठी आणखी एक उदाहरण घेऊ. यावेळी ऑस्ट्रेलियाला विश्वविजेता करण्यात सिंहाचा वाटा उचलणाऱ्या ट्रेविस हेड आणि न्यूझीलंडसाठी तीन शतकांसह ५६५ धावा करणाऱ्या रचिन रविंद्रला पाहा. सर्वांना वाटले क त्यांच्यावर धनलक्ष्मीचा वर्षाव होईल, परंतु असे घडले नाही.ट्रेविस हेडला सनराईज हैदराबादने ६.८ कोटी रुपये आणि रचिनला चेन्नई सुपर किंग्जने १.८ कोटी रुपये खरेदी केले. आता प्रश्न असा की, असे का घडले? याचे प्रमुख कारण म्हणजे मिनी लिलावात साधारपणे संघ आपली कमकुवत बाजू मजबूत करण्यावर भर देतात. यावेळी सर्व संघांनी द्रुतगती गोलंदाजांवर प्रामुख्याने पैसा लावला आणि यामागचे कारण म्हणजे २०२४ च्या आयपीएल सत्रात जलदगती गोलंदाजांना राहणारे महत्त्व. आतापर्यंत जलदगती गोलंदाजाला एकच बाऊंन्सर टाकण्याची मुभा होती. त्यामुळे एकदा बाऊन्सरचा सामना केला की तो पुन्हा टाकणार नाही, याबाबत फलंदाज निर्धास्त असायचे. परंतु आता फलंदाजांवर बाऊन्सरची दहशत राहणार आहे. परिणामी जलदगती गोलंदाजांना चांगली कामगिरी करण्याची संधी मिळणार आहे. या कारणांमुळेच सर्व संघ आपल्या गोलंदाजांची फळी मजबूत करत आहेत. त्यामुळे साहजिकच चांगल्या फलंदाजाकडे दुर्लक्ष केले गेले.

# नवीन वर्षाची सुरुवात धुंदीत करून नाही तर शुद्धीत करावी - दिलीप आमले

नवी मुंबई/ के. एच. हनवते :- आपला माणूस त्रिमूर्ती मित्र मंडळ आयोजित अखंड हरिनाम सप्ताह सेक्टर ६ नेरूळ नवी मुंबई (वर्ष १३ वे) दिनांक ३१/ १२ /२०23 रोजी अखंड हरिनामाला सुरुवात करून वर्षभर म्हणजे ३६५ दिवस १२ महिने ७ दिवस तास सेकंद आनंदात गेले मग वर्ष सुद्धा आनंदात जावा म्हणून गेल्या १३ वर्षापासून आमची परंपरा व ३१ डिसेंबरला विभागात कोणीही व्यसन करू नये शुद्धीत रहावे नवीन वर्षाची सुरुवात धुंदीत न करता शुद्धीत करावी..! या हेतूने १३ वर्षांपूर्वी आपला माणूस श्री दिलीप किसनराव आमले व सौ संगिताताई दिलीप आमले यांच्या संकल्पनेतून शुभ प्रेरक ( हभप ) किसन महाराज आमले यांच्या शुभहस्ते कलश पुजन व एव्हरग्रीन सोसायटी मधील सभासदा वीणा पुजन करून धार्मिक कार्यक्रम सुरू केले या ठिकाणी दररोज एक भाग्यवान वारकरी याला लायसन असलेल्या वारकऱ्यास हेल्मेट दिले जाते, एक पुरुष भाग्यवान व महिला भगवत गीता दिली जाते तसेच काल्याच्या दिवशी सोन्याची नथ व मानाची पैठणी भाग्यवान वारकरी महिला यांना भेट हजारो भाविकांना दररोज महाप्रसाद अन्नदान या ठिकाणी केले जाते. दरवर्षी प्रमाणात २०२४ या नवीन वर्षाचे स्वागत महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार यांच्या वाणीतून नागरिकांना व्यसन जनजागृती या विषयावर कीर्तनातून जनजागृती केली जाते बाल कीर्तनकार प्रवचनकार यांची कीर्तने प्रवचने ठेवून जी युवा पिढी सध्या व्यसनाकडे भरकटत चाललेली आहे त्यांना धार्मिक मार्गाने चला आई-वडिलांची सासू सासरे यांची सेवा करा नवीन वर्षाचे स्वागत महिला डोक्यावरती तुळस घेऊन तसेच विठ्ठल नामाचा गजर करीत संपूर्ण सेक्टर सहा मध्ये प्रदक्षिणा केली जाते यामध्ये तीन ते चार ठिकाणी रिंगण करून सर्व महिला पुरुष मुलं मुली आनंदाने माऊली माऊली करीत गजर करीत फुगडी खेळतात सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी महाराष्ट्रातील अनेक धार्मिक वारकरी टाळकरी तसेच विभागातील सामाजिक शैक्षणिक संस्कृती या नागरिकांचा सन्मान या कार्यक्रमासाठी त्रिमूर्ती मित्र मंडळ शिव वाहतूक सेवा नवी मुंबई अंकिता मोटार ट्रेनिंग स्कूल या मंडळाचा विशेष सहकार्य असतो तसेच या धार्मिक कार्यक्रमांमध्ये नवी मुंबई महानगरपालिकेचे माजी उपमहापौर मा अशोकराव गावडे साहेब स्थानिक नगरसेवक मा सुरज पाटील साहेब नगरसेविका मा सपना ताई गावडे माननीय श्री श्रीकांत धरणे साहेब वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाहतूक विभाग मा जाधव साहेब पोलीस निरीक्षक नेरूळ पोलीस स्टेशन श्री राजेश शिंदे साहेब श्री अनिल शेठ गावडे भाजीपाला व्यापारी श्री सुभाष खाडे साहेब माजी सह उपायुक्त डॉक्टर दिनेश जोशी साहेब श्री गणेश नाईकडे समाजसेवक श्री गणेश भगत समाजसेवक श्री दत्तात्रय नागरे माझी सह उपायुक्त प्रदीप गुरुकुल साहेब वार्ड अध्यक्ष भारतीय जनता पार्टी तसेच विभागातील अनेक राजकीय सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर सर्व टाळकरी माळकरी वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते यावर्षी भक्ती शक्ती गुरुकुल आळंदी देवाची हभप निलेश महाराज चव्हाण ,श्री सुरेश महाराज कोल्हे,हभप श्री अर्जुन महाराज सरजिने, श्री केशव महाराज शिवणे यां सर्व किर्तनकार यांना नेरूळ वारकरी भुषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले या कार्यक्रमाला सौ संगिताताई दिलीप आमले प्रमुख सल्लागार सौ छाय भोस सौ सगिता दाते ज्योती सुर्वे अलका शिंदे सुवर्ण मेहेर इमरान नाईक विजय साळुंखे सोपान जेजुरकर गणेश आमले श्री कोरडे श्री बाळासाहेब भोस उत्तम अबावडे बाळासाहेब नायकरे रमेश म्हस्के तसेच विभागातील सर्व भाविक यांनी सहकार्य केले







# 'क्लायमॅटिक चेंज सिझन'; सर्दी, खोकल्याचा घरोघरी ताप

डिसेंबर आणि जानेवारीचा काळ हा संक्रमणाचा काळ असतो. 'क्लायमॅटिक चेंज सिझन' असे या दिवसांना म्हटले जाते. या काळात अनेक आजार डोके वर काढतात. घरोघरी सर्दी-खोकला, तापाचे रुग्ण आढळून येतात.सध्याही घरोघरी तेच चित्र आहे. गेल्या तीन-चार वर्षांपासून कोरोनाची भीतीसुद्धा आहेच. त्यामुळे हा सर्दी-खोकला साधा की संक्रमणाचा हा प्रश्न साऱ्यांनाच पडतो. अशावेळी घाबरून न जाता खबरदारी आणि योग्य उपचार घेणे गरजेचे ठरते.साधा सर्दी-खोकला संक्रमण तर नव्हे?फक्त सर्दी-खोकला असेल कोमट पाणी पिणे, मिठाच्या पाण्याच्या गुळण्या करणे असे उपाय केले पाहिजेत. सर्दी-खोकल्यासोबत ताप असेल तर वरील उपायांसोबत तापाची एखादी गोळी तुम्ही घेऊ शकता.तीन दिवसांत या उपचारांनी आरामच होत नसेल तर तुमच्या फॅमिली डॉक्टरांचा सल्ला घ्यावा लागेल.कडाकाच्या थंडीमुळे जागोजागी शेकोट्या पेटवल्या जातात. फटाक्यांच्या धुरामुळे श्वासासंबंधित समस्या वाढतात. त्यामुळे शक्यतो यापासून दूर राहिले पाहिजे.टाळलीच पाहिजे गर्दीची ठिकाणे संक्रमणाच्या काळात साथरोगांचा प्रसार वेगाने होतो. त्यामुळे अशावेळी गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळले पाहिजे. सध्या लग्नसमारंभ, मोठ्या गर्दीचे कार्यक्रम यात नागरिकांची मोठ्या संख्येने गर्दी होत आहे. त्यामुळेच साथरुग्णांचे प्रमाण वाढत आहे.अशा कार्यक्रमांमध्ये जाणे गरजेचे असेल तर वेळोवेळी हात स्वच्छ करणे, तोंडाला मास्क लावणे, खोकला असणाऱ्या व्यक्तींपासून अंतर राखून बोलणे असे साधे उपाय केले पाहिजे. विशेष म्हणजे या दिवसांत गरोदर स्त्रिया, स्तनदा माता, लहान मुले आणि ज्येष्ठांची विशेष काळजी घेणे गरजेचे आहे.

# हिवाळ्यात रिकाम्या पोटी खा 'हे' पदार्थ, आरोग्यास मिळतील जबरदस्त फायदे

हिवाळ्यात दिवसाच्या सुरुवातीलाच जर पोट साफ झाले नाही तर त्याचा परिणाम तुमच्या संपूर्ण दिवसावर होतो. जर तुम्हीसुद्धा सकाळी पोट साफ न होण्याच्या समस्येने त्रस्त असाल तर या ठिकाणी आम्ही तुम्हाला काही पदार्थांची नावे सांगणार आहोत. हे पदार्थ रोज खाल्ल्याने तुमचे पोटही साफ होईल.हिवाळ्यात खाण्यापिण्याची विशेष काळजी घेणे गरजेचे असते. हिवाळ्यात रोगप्रतिकारक शक्ती देखील कमकुवत असते, शिवाय तुमची पचन आणि चयापचय क्रिया मंदावते, त्यामुळे सकस आहार घेणे आवश्यक आहे. हिवाळ्यात रिकाम्या पोटी काही पदार्थ खाणे आरोग्यासाठी फायदेशीर आहे. ते पदार्थ कोणते ते जाणून घेऊया.हिवाळ्यात कोमट पाणी आणि मधाने दिवसाची सुरुवात करा. खनिजे, जीवनसत्त्वे, फ्लेव्होनॉइड्स आणि एन्झाइम्सने मध समृद्ध असतो त्यामुळे तुमचे आतडे स्वच्छ ठेवण्यास मदत होते. कोमट पाण्यात मध मिसळून प्यायल्याने विषारी पदार्थ शरीराबाहेर टाकण्यास मदत होते. याशिवाय वजन कमी करण्यासाठी देखील हा उपाय खूप प्रभावी मानला जातो.अंडी अंडी हा प्रथिनांचा उत्तम स्रोत मानला जातो. दररोज अंडी खाल्ल्याने प्रथिनांची रोजची गरज सहज भागवता येते. हिवाळ्यात शरीराला उबदार ठेवण्यासाठी नाश्त्यामध्ये अंड्यांचा समावेश करणे हा उत्तम पर्याय मानला जातो.मनुका खाणे आरोग्यासाठी फायदेशीर रिकाम्या पोटी ड्रायफ्रुट्सचे सेवन करणे देखील आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकते. यामध्ये मनुके खाणे तुमच्या आरोग्यासाठी विशेष फायदेशीर मानले जाते. बदामाप्रमाणेच, मनुका रात्रभर पाण्यात भिजवून ठेवा जेणेकरून पोषक तत्वांचे शोषण वाढेल. सकाळी त्याचे सेवन केल्याने तुमची उर्जा वाढण्यास मदत होते.पपई उपाशी पोटी पपई खाणे शरीरासाठी फायदेशीर ठरते.

# स्मरता कोरोना काळ: होतो जीव घायाळ!

जागतिक कोव्हिड-१९ची लागण प्रारंभ दिन विशेष. कोरोनाव्हायरस रोग २०१९- कोविड -१९ हा एक अति संसर्गजन्य रोग आहे. जो गंभीर तीव्र श्वसन सिंड्रोम-संबंधित कोरोनाव्हायरस २ अथवा एसएआरएस- कोव्ह-२ या नावाच्या नवीन विषाणूद्वारे होतो. ज्या सार्स या रोगाने आग्नेय आशियामधे थैमान घातले होते. त्या कोरोनाव्हायरस विषाणूच्या प्रजातीतील पण पूर्णपणे नवीन असा हा विषाणू आहे. त्यावर प्रतिबंध- प्रवास टाळणे, वारंवार साबणाने व्यवस्थित हात धुणे, इतरांशी शारीरिक अंतर राखणे आदी आहेत. १३,५८,६९,७०४ पेक्षा जास्त लोक संक्रमीत तर २९,३५,२७१ पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला होता. कोव्हिड-१९च्या जबड्यातून बालंबाल बचावलेले श्री कृष्णकुमार लक्ष्मी-गोविंदा निकोडे गुरूजी यांचा हा अनुभवपूर्ण लेख... संपादक. डिसेंबर २०१९मध्ये चीनच्या हुबेई प्रांताची राजधानी वुहानमध्ये या नवीन आजाराची पहिली ओळख करण्यात आली होती. तेथेच हा रोग कृत्रिमपणे तयार करण्यात आला होता आणि त्यानंतर जागतिक स्तरावर या आजाराचा प्रसार झाला व त्याने जागतिक महामारीचे रूप घेतले. तो जगभरात पसरण्यास दि.७ जानेवारी २०२०पासून प्रारंभ झाला. या आजाराच्या सामान्य लक्षणांमध्ये ताप, खोकला आणि श्वास लागणे यांचा समावेश आहे, तर इतर लक्षणांमध्ये थकवा, स्नायू दुखणे, अतिसार, घसा खवखवणे, गंध कमी होणे आणि पोटदुखी या लक्षणांचा समावेश असू शकतो. सामान्यत: लागण झाल्यापासून लक्षणे दिसण्यापर्यंतचा कालावधी हा दोन ते चौदा दिवसांचा असू शकतो. बहुतेक प्रकरणांमध्ये सौम्य लक्षणे आढळतात, तर काही रोग्यांमधे व्हायरल न्युमोनिया आणि बहु-अवयव निकामी होण्याची भीती असते. १२ एप्रिल २०२१पर्यंत जगातील १८५ देशातील १३,५८,६९,७०४ पेक्षा जास्त लोकांना हा रोग झाला असल्याची प्रकरणे नोंदवली गेली आहेत. परिणामी २९,३५,२७१ पेक्षा जास्त लोक मरण पावले आहेत. त्यात माझीही पत्नी दि.६ एप्रिल २०२१ रोजी जगाचा निरोप घेऊन मला सोडून गेली. ७,७२,८४,५६६ पेक्षा जास्त लोक बरेही झाले आहेत. एकूण संसर्ग झालेल्या रोग्यांपैकी दोन टक्के लोकांचा मृत्यू झाला आहे. या कोरोना काळात हाहाकार माजला होता. हातावर पोट असणाऱ्यांची पुरती धांदल उडाली होती. म्हणून कोरोनातील परिस्थिती आठवली नव्हे नव्हे, केवळ कोरोना शब्द कानी पडला तरी आपल्याला रडू कोसळते. डोळ्यादेखत प्रियजणांना मरतांना पाहून जीव कळवळत होता, धास्तीने जीव गुदमरत होते. ती परिस्थिती शब्दांत मांडणे अशक्यच! महाराष्ट्रातील कोरोना विषाणू उद्रेकातील पहिल्या रुग्णाची नोंद दि.९ मार्च २०२० रोजी पुण्यात झाली होती. हा विषाणू प्रामुख्याने जवळच्या संपर्कादरम्यान खोकल्यामुळे, शिंकण्यामुळे किंवा बोलताना नकळत बाहेर पडणाऱ्या थुंकीच्या तुषारांमुळे लोकांमध्ये पसरतो. हे थेंब अथवा तुषार श्वासोच्छवासाच्या दरम्यानदेखील बाहेर पडून आजूबाजूच्या जमिनीवर किंवा पृष्ठभागांवर पडतात व अशा दूषित पृष्ठभागाला हाताने स्पर्श करून आणि नंतर तोच त्यांच्या चेहऱ्याला लावल्यानेही लोक संक्रमित होऊ शकतात. हे विषाणू ७२ तासांपर्यत या दूषित पृष्ठभागांवर जिवंत राहू शकतात. लक्षणे दिसल्यानंतरच्या पहिल्या तीन दिवसांत हा विषाणू सर्वात जास्त संक्रामक असतो, परंतु रोगाची लक्षणे दिसण्यापूर्वी देखिल आणि रोगाच्या नंतरच्या टप्प्यात देखील फार संक्रामक असतो. या रोगाच्या निदानाची मानक पद्धत म्हणजे नाकातून घेतलेल्या नमुन्यांची रीअल-टाइम रिव्हर्स ट्रान्सक्रिप्शन पॉलिमरेज चेन रिएक्शन- आरआरटी-पीसीआर नावाची तपासणी होय. वारंवार साबणाने व्यवस्थित हात धुणे, इतरांशी शारीरिक अंतर राखणे, विशेषतः लक्षणे असणाऱ्या लोकांकडून खोकताना किंवा शिंकताना रुमालाचा वापर करणे, अचानक शिंक आली असताना व रुमाल जवळ नसल्यास कोपर तोंडावर धरून हाताच्या आतल्या बाजूला शिकणे, न धुतलेले हात चेहऱ्यापासून दूर ठेवणे या व अशा उपायांचा वापर केल्यास विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यात मदत होते. ज्यांना विषाणूची लागण झाल्याचा संशय आहे अथवा सौम्य लक्षणे दिसत आहेत, अशांना आणि त्यांची काळजी घेणाऱ्या अथवा त्यांच्या संपर्कात येणाऱ्या सर्वांनी मास्क वापरण्याची शिफारस केली जाते. सध्या, कोरोनाव्हायरस रोग २०१९- कोविड -१९ वर जगात कोणतीही लस किंवा विशिष्ट उपचार नाहीत. फक्त रोग्याच्या लक्षणांवर आधारीत उपचार, प्रतिकार शक्ती वाढविण्याचे उपाय, विलगीकरण व काही प्रयोगात्मक उपाय या गोष्टींचा उपचार म्हणून वापर केला जातो. जागतिक आरोग्य संघटनेने हा कोरोनाव्हायरस रोग २०१९- कोविड-१९चा उद्रेक हा सार्वजनिक आरोग्यासाठी आंतरराष्ट्रीय आणीबाणी असल्याचे सांगत या उद्रेकाला जागतिक महामारी जाहीर केले आहे. टेड्रॉस डमहॅनोम गेब्रेयेसोस यांनी हे नाव घोषित केले. इंटरनॅशनल कमिटी ऑफ टॅक्सोनॉमी ऑफ व्हायरस यांनी सार्स-कोव्ह-२ हे नाव दिले होते. ढोबळ मानाने कोरोनाचे ४ प्रकार असे- २२९ई अल्फा कोरोनाव्हायरस, एनएल६३ अल्फा कोरोनाव्हायरस, ओसी४३ बीटा कोरोनाव्हायरस, एचकेयू बीटा कोरोनाव्हायरस सांगतात. कोरोनाव्हायरस रोग २०१९- कोविड-१९ विषाणूचा संसर्ग झालेल्यांना ताप, खोकला, थकवा आणि श्वास लागणे अशी फ्लूसारखी लक्षणे दिसू शकतात. श्वास घेण्यात अडचण, सतत छातीत दुखणे किंवा छातीवर दबाव असल्यासारखे वाटणे, गोंधळून जाणे, जागे होण्यास अडचण येणे आणि चेहरा किंवा ओठ निळे होणे या सारखी लक्षणे आढळल्यास तात्काळ वैद्यकीय उपचारांचा सल्ला दिला जातो. शिंका येणे, नाक वाहणे किंवा घसा खवखवणे अथावा मळमळ, उलट्या किंवा अतिसार ही लक्षणे फार कमी रुग्णांमधे दिसून आली आहेत. हा रोग कसा पसरतो? याबद्दलचे काही तपशील निश्चित केले गेले आहेत. जागतिक आरोग्य संघटनेने आणि अमेरीकेच्या सेंटर फॉर डिसीज कंट्रोल न्ड प्रिव्हेंशन- सीडीसी या संस्थांच्या म्हणण्यानुसार हे विषाणू मुख्यत: दोन व्यक्तींच्या जवळच्या संपर्काच्या वेळी तसेच खोकला, शिंका येणे किंवा बोलताना बाहेर पडणाऱ्या थेंबाद्वारे पसरतात. जवळचा संपर्क म्हणजे १ मीटर अथवा ३ फूट समजले जाते. सिंगापूरमधील एका संशोधनात असे आढळले आहे, की खोकताना किंवा शिंकताना रुमालाचा वापर न केल्यास किंवा मास्कचा वापर न केल्यास कोरोनाव्हायरस रोग २०१९- कोविड-१९ विषाणू हवेतून १५ फुटापर्यंत लांब पसरु शकत्तात. हे विषाणू जवळच्या लोकांच्या तोंडात किंवा नाकात शिरतात आणि श्वासोच्छवासाद्वारे फुफ्फुसांमध्ये पोहचतात. प्रारंभिक अभ्यासानुसार कोरोनाव्हायरस रोग २०१९ विषाणूच्या संक्रमित व्यक्तींची संख्या ही दर ६ ते ७ दिवसांची दुप्पट होते आणि याचे मूलभूत पुनरुत्पादन प्रमाण हे २.२ ते २.७ असल्याचे मानले जात होते, परंतु ७ एप्रिल २०२० रोजी प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार वुहानमधील साथीच्या सुरुवातीच्या काळात संक्रमित व्यक्तींची संख्या ही दर २.२ ते ३.३ दिवसांनी दुप्पट झाली होती. जेव्हा एखादी व्यक्ती एखाद्या दूषित पृष्ठभागाला स्पर्श केल्यानंतर त्याच हाताने डोळ्यावर, नाकात किंवा तोंडाला स्पर्श करते तेव्हा अशा कृतीने ती व्यक्ती संक्रमित होते. त्यास फोमेट ट्रान्समिशन म्हणून ओळखले जाते. संक्रमित व्यक्तीच्या मलमूत्रातून विषाणूचे संक्रमण पसरते, अशी चिंता व्यक्त केली जात असली तरी हा धोका कमी असल्याचेही मानले जाते. लक्षणे दिसू लागताना हा विषाणू सर्वात जास्त संक्रामक असतो, परंतु लक्षणे दिसत नसतानाही व ती उद्भवण्याआधीही एखाद्या व्यक्तीद्वारा विषाणू पसरवला जाण्याची शक्यता आहे, परंतु अशी जोखीम कमी असल्याचे मानले जाते. युरोपीयन सेंटर फॉर डिसीज प्रिव्हेंशन एंड कंट्रोल- ईसीडीसी या संस्थेच्या म्हणण्यानुसार हा रोग किती सहजतेने पसरतो, हे पूर्णपणे स्पष्ट नसले तरी एक व्यक्ती साधारणपणे दोन ते तीन इतर व्यक्तींना संक्रमित करते. विषाणुशास्त्र- सीव्हियर क्युट रेस्पेरेट्री सिंड्रोम कोरोनाव्हायरस २ हा एक व्हायरसचा वाण आहे, ज्यामुळे कोविड -१९ हा श्वसन रोग होतो. याला बोली भाषेत कोरोनाव्हायरस म्हणून ओळखले जाते. सुरुवातीच्या काळात याला नॉव्हेल कोरोनाव्हायरस- एनसीओव्ही हे तात्पुरते नाव दिले होते. जनुकीय विश्लेषणावरून असे दिसून आले आहे, की कोरोनाव्हायरस हा विषाणू बीटाकोरोनॅव्हायरस या विषाणूंच्या प्रजातीमधील आहे. बीटाकोरोनॅव्हायरस या प्रजातीतील इतर विषाणू म्हणजे सार्स व मार्स होय. दि.१७ जानेवारी २०२० रोजी जागतिक आरोग्य संघटनाने सार्स-सीओव्ही -२ साठी अनेक आरएनए चाचणीचे मानदंड प्रकाशित केले व रिअल-टाइम रिव्हर्स ट्रान्सक्रिप्शन पॉलिमरेज चेन रिएक्शन- आरआरटी-पीसीआर ही चाचणी कोरोना लागण झाल्याचे पुष्टीकरण करण्यासाठी प्रमाणित केली. ही चाचणी विशेषतः नाकातून घेतलेल्या नमुन्यांची अथवा घशातून घेतलेल्या थुंकीच्या नमुन्यांवर केली जाते. चिनच्या शास्त्रज्ञांना कोरोनाव्हायरसच्या नमुन्याच्या विश्लेषणांती या विषाणुचे जनुकीय गुणसुत्र मिळवण्यात यश मिळाले. जगभरातील संशोधकांना स्वतःचे रिअल-टाइम रिव्हर्स ट्रान्सक्रिप्शन पॉलिमरेज चेन रिएक्शन- आरआरटी-पीसीआर या चाचणीचे टेस्ट किट बनवण्यासाठी मदत होइल या उद्देशाने ते संशोधन चिनच्या शास्त्रज्ञांनी जाहीर प्रकाशित केले. दि.७ एप्रिल २०२० रोजी भारतात कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव पहाता राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेने एचएलएल लाइफकेयर लिमिटेड या सरकारी कंपनीने विकसित केलेले रॅपिड अँटिबॉडी ब्लड टेस्ट किटला प्राथमिक चाचणी म्हणून मान्यता दिली. १५ ते २० मिनिटांत होणाऱ्या या चाचणीच्या मदतीने कोरोना प्रादुर्भाव कोणत्या भागात वाढत आहे, याचा अभ्यास करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. या रॅपिड अँटिबॉडी ब्लड टेस्टची अचूकता केवळ ६० ते ७० टक्के आहे, असा चीनमधिल अनुभव आहे. अँटीबॉडी रक्त चाचणीत रुग्ण संक्रमित असल्याचे अढळल्यास त्या रुग्णांची जागतिक आरोग्य संघटनाने प्रमाणित केलेली आरआरटी-पीसीआर चाचणी होत राहील.यंदा सन २०२४ या नववर्षाच्या आगमनाबरोबरच जगात परत एकदा कोव्हिड-१९ने डोके वर काढले आहे. सर्वांच्या कानठळ्या बसल्या आहेत. भारतातही त्याने धडाकेबाज एन्ट्री केली आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार शुक्रवार दि.५ जानेवारी २०२४ रोजी भारतात कोविड-१९चे ७६१ रुग्ण आढळले. या आकडेवारीनुसार १२ नवीन मृत्यूची प्रकरणे देखील नोंदली गेली आहेत. शुक्रवारी सकाळी ८ वाजता मिळालेल्या माहितीनुसार देशभरातील सक्रिय कोविड-१९ प्रकरणे ४,४२३वरून ४,३३४पर्यंत कमी झाली आहेत. सक्रिय रुग्णांच्या संख्येत केरळ पहिल्या क्रमांकावर आहे. केरळमध्ये सध्या १,२४९, कर्नाटकात १,२४०, महाराष्ट्रात ९१४, तामिळनाडूमध्ये १९०, छत्तीसगड आणि आंध्र प्रदेशमध्ये १२८ सक्रिय प्रकरणे आहेत. मृत्युमुखी पडलेल्या १२ जणांपैकी पाच जण केरळमधील होते. कर्नाटकात चार, महाराष्ट्रात दोन आणि उत्तर प्रदेशात एकाचा मृत्यू झाला आहे. ५ डिसेंबरपर्यंत दैनंदिन रुग्णांची संख्या दुहेरी अंकात होती, मात्र थंडी वाढल्यानंतर रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. कोविड-१९च्या नवीन प्रकार जेएन-१चे प्रकरण १२ राज्यांमध्ये ६१९पर्यंत वाढले आहेत. ७६१ न्यू कोरोनाव्हायरस कर्नाटकात जेएन-१चे १९९, केरळमध्ये १४८, महाराष्ट्रात ११०, गोव्यात ४७, गुजरातमध्ये ३६, आंध्र प्रदेशात ३०, तामिळनाडूमध्ये २६, दिल्लीत १५, राजस्थानमध्ये चार, तेलंगणा, ओडिशा आणि हरियाणात दोन प्रत्येकी एक केस आहे. आरोग्य मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार राष्ट्रीय पुनर्प्राप्ती दर ९८.८१ टक्क्यांवर पोहोचला आहे. वेबसाइटनुसार देशभरात आतापर्यंत २२०.६७ कोटी कोविड-१९ डोस देण्यात आले आहेत. कोरोनाला तोंड देण्यासाठी सर्वांनी सजग पाऊले टाकलेलीच फायद्याची ठरतील, हे सांगणे न लगेच!

**********

**- संकलन व सुलेखन -**

**श्री कृष्णकुमार लक्ष्मी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त मधुभाष-**

# सामाजिक न्याय विभागाकडून भव्य व्यसनमुक्ति कार्यशाळा संपन्न जिल्हाभरातील शाळेत दर गुरुवारी विद्यार्थ्यांना मिळतील स्वच्छता, व्यसनमुक्ति, व्यक्तिमत्वाचे धडे - जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर -घुगे





लातूर दि.५ ( जिमाका ) जिल्ह्यातील जिल्हा परिषद आणि खाजगी शाळामध्ये दर गुरुवारी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्वच्छता, व्यसनमुक्ति आणि व्यक्तिमत्वाचे धडे द्यायचे आहेत जेणे करून उद्याची पिढी संस्कारक्षम बनेल. तसेच ' माझी शाळा – सुंदर शाळा हा उपक्रमही राबवायचा असल्याची माहिति जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर – घुगे यांनी दिली.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून दयानंद महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित एक दिवशीय 'नशामुक्त भारत अभियान व संविधान जागृती कार्यशाळा ' उदघाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. या वेळी जिल्हा पोलीस अधिक्षक सोमय मुंढे, सामाजिक न्याय विभागाचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, या कार्यशाळेसाठी आलेले वक्ते सर्वश्री नंदकुमार फुले, प्रा. डॉ. सविता शेटे, प्रा. डॉ. हर्षवर्धन कोल्हापूरे, डॉ. बी. आर. पाटील, प्रा. डॉ. अनिल जायेभाये, डॉ. विजयकुमार यादव, तृतीयपंथाच्या प्रतिनिधी म्हणून प्रिती माऊली लातूरकर,सह्याद्री वृक्ष चळवळीचे सुपर्ण जगताप, लातूर जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोष नाईकवाडी उपस्थित होते.

लातूर सारख्या शिक्षण पंढरी असलेल्या जिल्ह्यात वाढती व्यसनाधिनता हा चिंतेचा विषय, या बाबत पालकांमध्ये जागृती व्हावी म्हणून मी शिक्षक, पालकांना आवाहन करणारी चित्रफीत सोशल मीडियावर शेअर केली होती. ती चित्रफीत लाखो लोकांपर्यंत गेली, अनेक पालकांनी माझ्याकडे त्यांच्या मनातले बोलल्याची भावना व्यक्त केली. त्यानंतर हा विषय अधिकच गंभीर असल्याचे लक्षात आले. त्यातूनच आठवड्यातून एक दिवस शाळेत विद्यार्थ्यांच्या या विषयाकडे लक्ष देण्यासाठी ठेवण्याची कल्पना रुजली. येथून पुढे गुरुवारी जिल्ह्यातील प्रत्येक शाळेत हा पाठ गिरवला जाईल, त्या संदर्भातील सविस्तर मार्गदर्शन तत्वे शिक्षणाधिकारी कार्यालय काढेल अशी माहिती जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर – घुगे यांनी यावेळी दिली.

कल्याणकारी राज्यात अनेक लोकोपयोगी कायदे होतात पण त्या कायद्याचं ज्ञान शेवटच्या माणसानी आत्मसात करून एक संवेदनशील समाज निर्माण होणं गरजेचं आहे, त्या दृष्टीने अशा कार्यशाळा संजीवनी ठरतात. या कार्यशाळेतील त्या त्या विषयातील तज्ञ वक्ते, जिल्ह्यातील शाळांचे मुख्याध्यापक, विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर आले आहेत याचा अर्थ या विषयाचे गांभिर्य त्यांनाही आहे. त्यामुळे हे सर्वजन कृतीशील काम करतील अशी अपेक्षा जिल्हाधिकारी यांनी व्यक्त केली. जगात विविध विश्वविद्यालयात वेगवेगळ्या डिग्री मिळतील पण माणुसकी नावाची डिग्री आपल्याला आपल्या वागणुकीतून कमवावी लागते हे सांगून डोळस समाज होण्यासाठी अंधश्रद्धाला खतपाणी घालणाऱ्या रूढी आणि परंपराला पायबंद कायद्याने घातला आहे पण समाजाच्या मनातून जाण्यासाठी विवेकवादी समाज निर्माण होण्याची गरज जिल्हाधिकारी यांनी यावेळी प्रतिपादित केली.

जिल्हा पोलीस अधिक्षकांचा विशेष गौरव

लातूर जिल्ह्याचे जिल्हा पोलीस अधिक्षक सोमय मुंढे यांना गडचिरोली येथे असताना नक्षलवादी ऑपरेशन मध्ये उत्कृष्ट कार्यकेल्या बद्दल राष्ट्रपतीनी गौरव केला त्यासाठी सामाजिक न्याय विभागाकडून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर – घुगे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

समाजात वाढत चालेली व्यसनाधिनता आणि अंधश्रद्धा या अत्यंत महत्वाच्या विषयाच्या जागृतीसाठी ही कार्यशाळा ठेवल्याबद्दल सामाजिक न्याय विभागाचे अभिनंदन करून अंधश्रद्धेचे बळी शिकलेले लोकंही पडतात हे सोदाहरण जिल्हा पोलीस अधिक्षक सोमय मुंढे यांनी सांगितले. लातूर जिल्ह्यात अंधश्रद्धा विरोधी कायदा असेल वा व्यसनमुक्तिच्या जनजागृतीसाठी पोलिसांनी घेतलेला पुढाकार असेल त्यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन समिती, विविध संघटना नागरिक पुढे येऊन सहकार्य करतात हे आपण अनुभवल्याचे जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाजकल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवशेटवार यांनी केले. त्यात त्यांनी या कार्यशाळेच्या आयोजना मागची भूमिका सांगून या कार्यशाळेत प्रशिक्षण घेऊन त्या त्या शाळेचे मुख्याध्यापक याबाबतीत वर्षभर जनजागृत करणार आहेत अशी माहिती दिली. या कार्यशाळेत नंदकुमार फुले, प्रा. डॉ. सविता शेटे, प्रा. डॉ. हर्षवर्धन कोल्हापूरे, डॉ. बी. आर. पाटील, प्रा. डॉ. अनिल जायेभाये, डॉ. विजयकुमार यादव, प्रिती माऊली लातूरकर यांनी अंधश्रद्धा, संविधान जागृती, दिव्यांग कल्याण, तृतीय पंथी याविषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान

# बजाज फायनान्स लि.ने नवीन वर्षाचा उत्साह वाढवला डिजिटल मुदत ठेव अनुभव ८.८५% पर्यंत

लातूर,––– बजाज फ़ायनान्स लिमिटेड., बजाज फ़िन्सर्वचा एक भाग असून, देशातील सर्वात मोठ्या आर्थिक सेवा समूहांपैकी एक आहे, ज्यांच्याद्वारे त्यांच्या प किंवा संकेतस्थळाचा माध्यमाने बुक केलेल्या डिजिटल मुदत ठेवींवरती(एफ़डी) आकर्षक असा ८.८५% चा व्याज दर दिला जाणार आहे. नवीन वर्षाचा शुभ प्रसंगी हे जाहिर करताना, डिजिटल एफ़डीचा माध्यमातून बचत करण्याचे प्रोत्साहन ग्राहकांना देत, डिजिटल आणि सहाय्यक डिजिटल मोड मध्ये मुदत ठेवी बुक करण्याची शिफ़ारस केली जाणार आहे. बजाज फ़िन्सर्व प आणि संकेतस्थळाच्या माध्यमाने बचत करण्याचा प्रवास हा अगदी सहज, सुरक्षित आणि जवळ–तत्काळ ऋऊ बुकिंगसह अखंड तंटामुक्त असणार आहे, कारण फ़क्त ––– क्लिक केले की एफ़डी बुक होणे अगदी सहज शक्य असेल. जानेवारी २,२०२४ पासून परिणामी ठरणाऱ्या, बाजाज फ़ायनान्सचा या मुदत ठेवींवरती ८.८५% वार्षिक व्याज दर जेष्ठ नागरिकांना ४२ महिन्यांच्या मुदत ठेवींवरती मिळाणार असून या मुदत ठेवी प किंवा संकेतस्थळाच्या माध्यमाने बुक केल्या गेल्या पाहिजे. ६० वर्षा खालील ठेवीदारांना ८.६०% वार्षिक व्याज दराने मुदत ठेवी बुक करता येणार आहेत. नवीन मुदत ठेवी आणि त्यांच्या परिपक्वतेनंतर ४२ महिन्यांकरिता केल्या जाणाऱ्या ५ कोटी रूपयांपर्यंतचा ठेवींवरती सुधारीत व्याज दर लागू केले जातील. बजाज फ़ायनान्सच्या मुदत ठेवी आणि गुंतवणूकीचे प्रमुख, श्री. सचिन सिक्का या बद्दल बोलताना म्हणाले, कोणत्याही तंट्याविना असलेली आमची प्रक्रिया, आकर्षक व्याज दर आणि ग्राहकांना आवडतील अशा धोरणामुळे बजाज फ़ानान्सचा मुदत ठेवींबद्दलचा ग्राहकांचा विश्वास अजून वाढणार आहे. २ वर्षात दुप्पाटीने झालेल्या आमचा ठेवींमधील वाढ ही देखील बजाज या ब्रॅन्डमधील ग्राहकांचा विश्वास दर्शविणारी आहे. आमचा नव्या मुदत ठेवींमुळे ग्राहकांना आता डिजिटल पद्धतीचा अवलंब करता येणार आहे. हा एक सहज आणि सोपा असा डिजिटल प्रवास असणार आहे, ज्यामध्ये उच्च व्याजदर हा विशेषत: प आणि संकेतस्थळाच्या वापरामुळे मिळणार आहे. यामुळे मुदत ठेव सुरू करण्याचा मार्गाला एक डिजिटल प्रवाह मिळणारा आहे. बजाज फ़ायनान्सकडे सप्टेंबर ३०,२०२३ पर्यंत ७६.५६ दशलक्ष ग्राहक असून त्यातील ४४.६८ दशलक्ष ग्राहक नेटच्या माध्यमाने पचे व्यासपिठ वापरतात. आर्थिक पद्धतीचा पचा विचार केला. डेटा आई ओ (ऊरींर.ळे) अहवालानुसार बजाज फिनसर्व्ह ॲप हे भारतातील प्लेस्टोअरवर आर्थिक डोमेनमधील चौथे सर्वाधिक डाउनलोड केलेले ॲप आहे. कंपनी देशातील सर्वात मोठी ठेव घेणारी एनबीएफसई म्हणून उदयास आली आहे ज्याचे एकत्रित ठेव पुस्तक रु. ३० सप्टेंबर २०२३ रोजी ५४,८२१ कोटी आहे, आणि बजाज फ़ायनान्स मुदत ठेवी उपक्रम हा सर्वाधिक स्थिरता असलेला उपक्रम असून क्रिसल (सीआरआयएफ़आयएल) द्वारे एएए/स्थिर आणि आयसीआरए द्वारे एएए(स्थिर) प्रमाणित केले गेले आहे, ज्यामुळे गुंतवणूकदाराकरिता हा गुंतवणूकीचा एक सुरक्षित असा पर्याय ठरतो. कंपनीचा पचा माध्यमातून गुंतवणूकीची एक बाजारपेठ खुली होणार आहे, जिथे ग्राहकांना म्युच्युअल फ़ंडाचे देखील अनेक पर्याय उपलब्ध असतील.

# नवी मुंबई महानगरपालिकेचे सीबीडी बेलापूर ते नेरूळ मुख्य रस्त्यातील चेंबर्सला झाकनच नाहीत

नवी मुंबई / के. एच. हनवते :– महानगरपालिके शेजारील सिबीडी बेलापूर ते नेरूळ या मुख्य रस्त्यावर नवीन ब्रिज बनवण्यात अले परंतू सडक फुटपाथची दुरवस्था आशी झालेली आहे की, सडक आणि फुटपाथ दोन्ही लेवल एकच आसल्याने आणि त्यातील १०/१५ चेंबर्स ला झाकनच नसल्यामुळे त्या ठिकाणाहून ये जा करणाऱ्या प्रवाशांना किंवा दुचाकी वाहन चालकांना जिवमुटीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. समंधीत अधिकार्यांनी या कडील लक्ष केंद्रित करून लवकरच सुधारणा केली तर ठिक आहे, नाही तर कधी पण त्या ठिकाणी अपघात घडु शकतो अशी दुरावस्था त्या सडक फुटपाथची झालेली आहे. तरी समंधीत महानगरपालिकेने त्या ठिकाणी लवकरात लवकर सुधारणा करावी अशी प्रवासी जनतेतून मागणी



केली जात आहे.

# कराड परिवाराच्या मागे त्रिवेणी संगम असल्याने संत गोपाळबुवा कारखाना निश्चितपणे प्रगती करेल



लातूर दि–०६ :– जन्मोजन्मीची पुण्याई, सर्वांचा स्नेह आणि साधुसंताच्या प्रती समर्पणाचा भाव असा कराड परिवाराच्या मागे त्रिवेणी संगम असल्याने रामेश्वरच्या पवित्र भूमीत उभारण्यात येत असलेला संत श्री गोपाळ बुवा महाराज साखर कारखाना यशस्वी होऊन भविष्यात निश्चितपणे प्रगती करेल असे सांगून प्रत्येक वर्षी या कारखान्याची गाळप क्षमता वाढत राहो अशी सदिच्छा परमपूज्य श्री विद्यानंद बाबा महाराज गातेगावकर यांनी व्यक्त केली.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक करण्यासाठी रामेश्वर परिसरात उभारण्यात येत असलेल्या संत श्री गोपाळबुवा महाराज शुगर अँड अँग्रो फूड इंडस्ट्रीज या साखर कारखान्याची उभारणी गेल्या काही दिवसापासून युद्धपातळीवर सुरू आहे. कारखान्याच्या मशनरी उभारणीचा शुभारंभ शुक्रवार ५ जानेवारी २०२४ रोजी परमपूज्य श्री विद्यानंद बाबा महाराज गातेगावकर यांच्या शुभहस्ते विधिवत पूजनाने करण्यात आला. त्यावेळी आशीर्वाद पर मनोगत व्यक्त करताना परमपूज्य विद्यानंदजी सागर बाबा महाराज यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी परमपूज्य बालकानंद स्वामी महाराज, हभप लालासाहेब नाना महाराज, कारखान्याचे चेअरमन तुळशीरामअण्णा कराड, व्हाईस चेअरमन राजेश कराड यांच्यासह काशीरामनाना कराड, बालूतात्या कराड, रणवीर कराड, राजवीर कराड, भाजपाचे महेंद्र गोडभरले, अनिल भिसे, ॲड. दशरथ सरवदे, बन्सी भिसे, सतीश आंबेकर, नवनाथ भोसले, सुरज शिंदे, गोविंद नरहरे, गोपाळ पाटील, भैरवनाथ पिसाळ, सुधाकर कराड, विनायक मगर, शंकर चव्हाण, बाबा भिसे यांच्यासह कारखाना परिसरातील ऊस उत्पादकासह शेतकरी हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संत श्री गोपाळ बाबांच्या अखंड कृपेने डॉ. विश्वनाथजी कराड यांच्या प्रेरणेने आणि राजेश कराड यांच्या परिश्रमातून सर्वांच्या यथायोग्य सहकार्याने रामेश्वर आणि या परिसरातील शेतकऱ्यांना गरज असलेल्या प्रकल्पाची उभारणी होत आहे. ही बाब शेतकऱ्याच्या आर्थिक प्रगतीसाठी आनंददायी असल्याचे सांगून परमपूज्य विद्यानंद बाबा महाराज गातेगावकर म्हणाले की, हा साखर कारखाना आजूबाजूच्या साखर कारखान्याच्या बरोबरीने निश्चितपणे प्रगती करेल भविष्यात या कारखान्याची वाटचाल यशाकडेच राहील यात शंका नाही असे बोलून दाखवले.

कारखान्याच्या शेअर्सची रक्कम २५ हजार रुपये असून त्यापैकी पहिल्या टप्प्यात १० हजार रुपये जमा करावेत उर्वरित १५ हजार रुपये शेतकऱ्यांच्या ऊस बिलातून कपात केली जाईल. सदरील १५ हजार रुपये इतर कारखान्याप्रमाणे कर्ज असणार नाही अथवा त्यावर कुठलीही व्याजाची आकारणी केली जाणार नाही. तेव्हा ऊस उत्पादक गरजवंत शेतकऱ्यांनी लवकरात लवकर शेअर्स नोंदणी करावी असे आवाहन व्हाईस चेअरमन राजेश कराड यांनी केले.

यावेळी कारखान्याचे चेअरमन तुळशीरामअण्णा कराड यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. मशनरी उभारणी कार्यक्रमास कारखाना परिसरातील शेतकरी ऊस उत्पादक हितचिंतक मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नवी मुंबई महानगरपालिका विकसित भारत संकल्प योजना अंतर्गत महा शिबिराचे आयोजन



नवी मुंबई :– नवी मुंबई महानगरपालिका विकसित भारत संकल्प योजना अंतर्गत, केंद्र शासनाच्या विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी, सानपाडा नवी मुंबई येथे महा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यात सानपाडा नवी मुंबई सेक्टर ५ येथील नागरी आरोग्य केंद्र येथील वैद्यकीय अधिकारी डॉक्टर महेश चव्हाण आणि त्यांचे सहकारी यांनी सुद्धा सहभाग नोंदवला होता. तसेच या शिबिरात आयुष्यमान भारत कार्ड, उज्वला योजना, मुद्रा कर्ज योजना, आत्मनिर्भर निधी योजना, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान, प्रधानमंत्री आवास योजना, आधार अपडेट, अशा विविध योजनेचा लाभ नवी मुंबईतील बऱ्याच लोकांना या शिबिरांतून लाभ घेण्यात आला.

# दर्पण दिनानिमित्त बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतीला अभिवादन करून जिल्हा माहिती कार्यालयात पत्रकार दिन साजरा



लातूर दि.६ ( जिमाका ) जिल्हा माहिती कार्यालयात आज दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे विभागीय माहिती कार्यालयाच्या उपसंचालक डॉ. सुरेखा मुळे यांच्या हस्ते पुष्पहार घालून त्यांच्या स्मृतीला अभिवादन करून पत्रकार दिन साजरा करण्यात आला.

यावेळी जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील, सहायक संचालक डॉ. शाम टरके, ज्येष्ठ पत्रकार रामराव गवळी, प्रदीप नंणदकर, नृसिंह घोणे, अशोक चिंचोले, चंद्रकांत झेरीकुंडे,विजयकुमार स्वामी, अशोक देडे, लहू शिंदे, रघुनाथ बनसोडे, मासुम खान, अशोक हणवते, वामन पाठक, विष्णू आष्टीकर, हारुण मोमीन, लिंबराज पन्हाळकर, यशवंत पवार, संजय बुच्चे, महादेव डोंबे, शिवाजी कांबळे, साईनाथ घोणे, शशिकांत पाटील, सितम सोनवणे, नितीन चालक, शिरीषकुमार शेरखाने, संतोष सोनवणे, महादेव पोलदासे, अशोक कुलकर्णी, मधुकर चलमले, धोडींराम ढगे, चंद्रकांत इंद्राळे, प्रभाकर शिरुरे, मुरली चेंगटे, काकासाहेब गुट्टे, अमोल घायाळ यांनीही बाळशास्त्री जांभेकरांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले. जिल्ह्यातील संपादक, जिल्हा प्रतिनिधी, इलेक्ट्रॉनिक मिडीयाचे प्रतिनिधी, छायाचित्रकार, पत्रकार तसेच जिल्हा माहिती कार्यालय व विभागीय माहिती कार्यालयातील कर्मचारी आदिंची यावेळी उपस्थिती होती. बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ ला मराठीतले पहिले नियतकालिक सुरु केले. तो दिवस राज्यभरात पत्रकार दिन म्हणून साजरा होतो.

# मनपाच करतेय पाण्याची नासाडी

लातूर : प्रतिनिधी संभाव्य पााणीटंचाई लक्षात घेता लातूर शहर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने शहरातील विद्यूत पंप व हातपंपांच्या दुरुस्तीला प्राधान्य दिले असले तरी दुरुस्त केलेल्या विद्यूत पंपातील हजारो लिटर्स पाणी वाया जात असतना त्याकडे मात्र अक्षम्य दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे विद्यूत पंप व हातपंप दुरुस्त करुन पाणी वाया जात असेल तर ते दुरुस्त न केलेलेच बरे. कारण जमिनीतील पाण्याची पातळीतर शाबूत राहिल. मनपा यंत्रणेकडूनच पाण्याची नासाडी होत असेल तर नागरिकांनी पाणी काटकसरीने वापराने, असे आवाहन करण्याला काहींच अर्थ उरत नाही, ही बाब मनपा प्रशासनाने लक्षात घेऊन पाणी वाया जाणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.यंदाच्या पावसाळ्यात लातूर जिल्ह्याच्या वार्षिक सरासरी ऐवढाही पाऊस पडलेला नाही. लातूर शहराला पाणी पुरवठा होणा–या मांजरा धरणाच्या पाणलोट क्षेत्रातही दमदार पाऊस पडलेला नाही. परिणामी मांजरा धरणातील पाणीपातळीत लक्षणीय वाढ झालेली नाही. मांजरा धरणात पुरेसा पाणीसाठा झालेला नाही. सद्य:स्थितीत मांजरा धरणात १९.६२ टक्के जिवंत पाणीसाठा आहे. या पाण्यावर धरणावरील लातूर शहरासह विविध २१ पाणीपुरवठा योजना अवलंबुन आहेत. लातूर शहरासाठी दररोज ४० ते ५० एमएलडी पाणी मांजरा प्रकल्पातून उचलले जाते. त्यावरचा थोडासा ताण कमी व्हावा, या हेतूने लातूर शहर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने शहरातील विद्यूत पंप व हातपंपाच्या दुरुस्तीला प्राधान्य देऊन जिथे पाणी आहे तिथे पंप सुरु केले आहेत. परंतू, याच ठिकाणी पाणी वाया जात असताना त्याकडे मात्र कमालीचे दुर्लक्ष केले जात आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE